Our Company was originally incorporated as a private limited company under the Companies Act, 1956, in the name and style of "Maple Newgen Trade Private Limited" vide Certificate of Incorporation dated January 05, 2009, issued by the Registrar of Companies, National Capital Territory of Delhi – I. Subsequently, the name of our Company was changed from "Maple Newgen Trade Private Limited" to "Tinna Viterra Trade Private Limited" on November 20, 2009. Thereafter, the name of our Company was changed from "Tinna Viterra Trade Private Limited" to "Tinna Trade Private Limited" on June 06, 2013. Further, the name of our Company was changed from "Tinna Trade Private Limited" to "Tinna Trade Limited" on December 08, 2015, pursuant to its conversion from a private company into a public company under the applicable provisions of the Companies Act, 2013. Subsequently, the name of our Company was changed from "Tinna Trade Limited" to "Fratelli Vineyards Limited" on July 26, 2024, pursuant to a fresh Certificate of Incorporation consequent upon the change of name issued by the Registrar of Companies. For details of changes in our name and address of our registered office, see "General Information" on page 49 of LOF.

**Registered Office:** No. 6, Sultanpur, Mandi Road, Mehrauli, Delhi, India – 110030; **Telephone:** 011-49518530
**Contact Person:** Ms. Monika Gupta (Company Secretary & Compliance Officer); **E-mail:** invester.ttl@tinna.in;
**Website:** www.fratelliwines.in; **Corporate Identity Number:** L11020DL2009PLC186397

**PROMOTERS OF OUR COMPANY: GAURAV SEKHRI, PUJA SEKHRI, ADITYA BRIJ SEKHRI, BHUPINDER SEKHRI & SONS HUF, ARNAV SEKHRI, BHUPINDER & KAPIL HUF, SHOBHA SEKHRI, AARTI SEKHRI, BHUPINDER KUMAR SEKHRI, KRISHNAV SEKHRI**

**FOR PRIVATE CIRCULATION TO THE ELIGIBLE EQUITY SHAREHOLDERS OF FRATELLI VINEYARDS LIMITED (OUR "COMPANY" OR THE "ISSUER")**
**ONLY**

**ISSUE OF UP TO 33,18,503* PARTLY PAID-UP EQUITY SHARES OF FACE VALUE OF ₹10 EACH OF OUR COMPANY (THE "RIGHTS EQUITY SHARES") FOR CASH AT A PRICE OF ₹90/- PER RIGHTS EQUITY SHARE (INCLUDING A PREMIUM OF ₹80/- PER RIGHTS EQUITY SHARE) ("ISSUE PRICE") AGGREGATING UP TO ₹2986.65 LAKH* ON A RIGHTS BASIS TO THE ELIGIBLE EQUITY SHAREHOLDERS OF OUR COMPANY IN THE RATIO OF 10 (TEN) RIGHTS EQUITY SHARES FOR EVERY 131 (ONE HUNDRED AND THIRTY ONE) FULLY PAID-UP EQUITY SHARE HELD BY THE ELIGIBLE EQUITY SHAREHOLDERS ON OCTOBER 30, 2026 ("RECORD DATE") (THE "ISSUE"). FOR FURTHER DETAILS, SEE "TERMS OF THE ISSUE" BEGINNING ON PAGE 80 OF THE LOF.**

* Assuming full subscription

| RIGHTS ISSUE PERIOD EXTENDED | |
|---|---|
| **ISSUE CLOSING DATE (OLD)** | **ISSUE CLOSING DATE (REVISED)** |
| **TUESDAY, NOVEMBER 17, 2026** | **WEDNESDAY, NOVEMBER 18, 2026** |

**INDICATIVE TIMELINE**

| Rights Activity Schedule | Revised/Extended Date |
|---|---|
| Last date for Off-Market Renunciation of Rights Entitlements | Tuesday, November 17, 2026 |
| Issue Closing Date* | Wednesday, November 18, 2026 |
| Finalisation of Basis of Allotment (on or about) | Thursday, November 19, 2026 |
| Date of Allotment (on or about) | Thursday, November 19, 2026 |
| Date of credit of Rights Equity Shares (on or about) | Friday, November 20, 2026 |
| Date of listing (on or about) | Friday, November 20, 2026 |

*Eligible Equity Shareholders are requested to ensure that renunciation through off-market transfer is completed in such a manner that the Rights Entitlements are credited to the Demat account of the Renouncees on or prior to the Issue Closing Date.*
** Therefore, all the references to the Issue Closing Date made in the Letter of Offer dated October 26, 2026 ("LOF"), the Composite Application Form ("CAF"), and the issue opening advertisement published on November 04, 2026 shall be November 18, 2026. All other terms and conditions mentioned in the LOF, Application Form, and Issue Advertisement continue to be applicable.*

| | | |
|---|---|---|
| **ASBA*** | Simple, Safe, Smart Way of making an application- Make Use of It!!!! | * Applications supported by blocked amount (ASBA) is a better way of applying to issues by simply blocking the funds in the bank account. For further details, check the section on ASBA below. |

This is to inform eligible shareholders of the Company that the date of closure of the Rights Issue of the Equity Shares of the Company, which opened on Friday, November 06, 2026, and is scheduled to be closed on Tuesday, November 17, 2026, will now be extended by one (1) day up to Wednesday, November 18, 2026, in order to provide an opportunity to shareholders to exercise their rights in the Rights Issue.

Accordingly, the last date for submission of the duly filled-in Application Form (along with the amount payable on Application) is Wednesday, November 18, 2026. Equity Shareholders of the Company who are entitled to apply for the Rights Issue as mentioned above are requested to take note of the Issue Closing Date as Wednesday, November 18, 2026.

The rest of the contents of the pre-issue advertisement published by the Company on November 04, 2026, including but not limited to the details of the specified investors, minimum subscription requirements, objects of the Issue, terms of the Issue, entitlement ratio, issue price, payment terms, eligibility criteria, procedure for application, procedure for renunciation of Rights Entitlements, details of the Registrar to the Issue, Lead Manager to the Issue, availability of the Letter of Offer and other terms and conditions of the Rights Issue, shall remain unchanged and continue to be applicable as disclosed.

**Facilities for Application in the Issue**

**In accordance with Regulation 76 of the SEBI ICDR Regulations, the SEBI Rights Issue Circulars and the ASBA Circulars, all Investors desiring to make an application in this issue are mandatorily required to use either the ASBA process. Investors should carefully read the provisions applicable to such Applications before making their Application through ASBA. For details, see "Terms of the Issue- Making of an Application through the ASBA process" beginning on page 84 of the LOF."**

**ALLOTMENT OF THE RIGHTS EQUITY SHARES IN DEMATERIALIZED FORM:** PLEASE NOTE THAT THE RIGHTS EQUITY SHARES APPLIED FOR IN THIS ISSUE CAN BE ALLOTTED ONLY IN DEMATERIALIZED FORM AND TO THE SAME DEPOSITORY ACCOUNT IN WHICH OUR EQUITY SHARES ARE HELD BY SUCH INVESTOR ON THE RECORD DATE. FOR DETAILS, SEE "ALLOTMENT ADVICE OR REFUND/ UNBLOCKING OF ASBA ACCOUNTS" ON PAGE 106 OF THE LETTER OF OFFER.

**There is no change in the Letter of Offer dated October 26, 2026, the Rights Entitlement Letter and the Application Form except for modification in the Issue Closing Date and resultant change in indicative timetable of post-issue activities on account of extension of the Issue Closing Date**

Investors may contact the Registrar or the Company Secretary and Compliance Officer for any pre-issue or post-issue related matter. All grievances relating to the ASBA process may be addressed to the Registrar, with a copy to the SCSBs in case of ASBA process, giving full details such as name, address of the Applicant, contact number(s), e- mail address of the sole first holder, folio number or demat account number, number of Rights Equity Shares applied for, amount blocked, ASBA Account number, and the Designated Branch of the SCSBs where the Application Form or the plain paper applications, as the case may be, was submitted by the Investors along with a photocopy of the acknowledgement slip.

**For Fratelli Vineyards Limited**
**On behalf of the Board of Directors**
**Sd/-**
**Ms. Monika Gupta**
**Company Secretary and Compliance Officer**

**Date: November 18, 2026**
**Place: Delhi**

**भारतीय जवान बांगलादेशच्या हद्दीत**

नवी दिल्ली : आंतरराष्ट्रीय सीमा ओलांडून चुकून बांगलादेशच्या हद्दीत गेलेल्या सीमा सुरक्षा दलाच्या जवानाला बांगलादेशच्या सैनिकांनी मंगळवारी ताब्यात घेतले. सिल्हेट जिल्ह्यात ही घटना घडली. या जवानाला परत आणण्यासाठी दोन्ही देशांच्या अधिकाऱ्यांमध्ये ध्वजबैठक आयोजित करण्यात येणार आहे.

# राजधानी अमरावती : नायडू यांची नावीन्यपूर्ण संकल्पना

**राष्ट्रहिताच्या नजरेतून** — शेखर गुप्ता

**चंद्रबाबू नायडू यांनी राजधानी अमरावतीची संकल्पना कधीही सोडून दिली नव्हती यावरून त्यांची याबाबतची वचनबद्धता दिसून येते. त्यांनी ही संकल्पना पुन्हा कार्यान्वित करण्याचे आश्वासन दिले होते आणि आता त्या दिशेने ते अत्यंत वेगने वाटचाल करीत आहेत.**





या आठवड्याचा लेख अमरावती येथून लिहिला गेला आहे. विजयवाड्याच्या पलीकडे, कृष्णा नदीच्या काठी चंद्राबाबू नायडू आंध्र प्रदेशासाठी राजधानीचे हे शहर उभारत आहेत. मात्र, हा लेख केवळ अमरावतीपुरता मर्यादित नाही; तर त्यामागील संकल्पना हा आहे. भारतीय राजकारणात ही एक नाविन्यपूर्ण गोष्ट आहे. हे एक धाडसी पाऊल अशा कारणासाठी आहे कारण कोणताही राजकारणी अशा कामात हात घालू इच्छित नाही जे एका कार्यकाळात (किंवा चार वर्षांत) पूर्ण होऊ शकत नाही. कारण पाचवे वर्ष निवडणुकीच्या प्रचारासाठी राखून ठेवलेले असते. नवीन राजधानी उभारण्यासाठी खूपच जास्त कालावधी लागतो. मतदारांसमोर या आश्वासनाच्या पूर्तीला एक यशाची बाब म्हणून सादर करण्यासाठी एक कार्यकाळ पुरेसा नसू शकतो. आणि जर तुम्ही सत्तेवरून पायउतार झालात तर? जसे २०१९ मध्ये चंद्राबाबू नायडू यांच्या बाबतीत घडले. तेव्हा त्यांनी जमिनीच्या एकत्रीकरणाची प्रक्रिया नुकतीच पूर्ण केली होती. त्यांचे उत्तराधिकारी वाय.एस. जगन मोहन रेड्डी आणि त्यांच्या पक्षाने या प्रकल्पाला एक 'ढोंग' असे संबोधले. त्यांच्या मते हा प्रकल्प केवळ एका विशिष्ट जातीला म्हणजेच नायडू यांच्या स्वतःच्या 'कम्मा' जातीला फायदा पोहोचवण्यासाठी आखला गेला होता. कारण या प्रकल्पासाठी जमिनी देणाऱ्या शेतकऱ्यांपैकी बहुतांश त्याच जातीचे होते.

जगन यांनी हा प्रकल्प रद्द केला. यासाठी जमीन देणाऱ्या शेतकऱ्यांना दिली जाणारी वार्षिक भरपाई (ॲन्युइटी) बंद केली आणि त्याऐवजी आंध्र प्रदेशला तीन राजधानींची शहरे असतील अशी घोषणा केली. विशाखापट्टणम ही कार्यकारी राजधानी, अमरावती ही विधिमंडळ राजधानी आणि कर्नूल ही न्यायिक राजधानी असेल, असे त्यांनी सांगितले.

नायडू यांची अमरावती या नव्या राजधानीच्या कल्पनेप्रती असलेली बांधिलकी यावरून दिसून येते की, त्यांनी कधीही हा विचार सोडून दिला नाही. त्यांनी ही संकल्पना पुन्हा जिवंत करण्याचे आश्वासन दिले आणि आता ते अत्यंत वेगवान गतीने तिची उभारणी करत आहेत. हा वेग इतका प्रचंड आहे की, भविष्यात जर सरकार बदलले तरी मागे फिरण्यासारखे फारसे काही उरलेले नसेल. निवडणुकीच्या निकालांत होणाऱ्या बदलापेक्षाही अधिक वेगाने हे नवीन राजधानी प्रत्यक्षात साकारत आहे. इतकी महत्त्वाकांक्षी, व्यापक आणि खर्चिक कल्पना पूर्ण करण्याच्या जिद्दीमुळेच हा प्रकल्प अनोखा ठरतो. राजकीय, व्यावसायिक, उच्च तंत्रज्ञानयुक्त, सांस्कृतिक आणि शैक्षणिक अशा सर्व अंगांनी परिपूर्ण असलेले आणि ज्याला स्वतःचा एक 'आत्मा' आहे असे शहर उभारण्याची संकल्पनाच आपल्याला अपरिचित आहे. आपण गरजेपोटी काही सरकारी वसाहती किंवा नगरे नक्कीच उभारली आहेत. जसे गांधीनगर, नवा रायपूर किंवा भुवनेश्वर. परंतु, ही केवळ प्रशासकीय केंद्रे आहेत. स्वतंत्र भारताने उभारलेले एकमेव नवीन शहर म्हणजे चंदीगड. ज्याची रचना पाच लाख लोकांसाठी करण्यात आली होती. आज तिथे कदाचित १४ लाख लोक राहतात.

भारत हा मूलतः नवीन शहर उभारणे किंवा अस्तित्वात असलेल्या शहराचा कायापालट करणे, या कल्पनांच्या विरोधात राहिला आहे. मग अशा स्थितीत शहरांमध्ये संसाधने का गुंतवायची? आज या खेड्यांमधील जीवनमान अत्यंत दयनीय आहे. तिथे संधींचा अभाव आणि सामाजिक विषमताही मोठ्या प्रमाणावर आहे. म्हणूनच लाखो लोक गावे सोडून शहरांकडे स्थलांतर करत आहेत.

भारतात शहरीकरण होत गेले. करोडो लोकांनी आपली गावे सोडून याच शहरांकडे धाव घेतली आणि ते प्रामुख्याने अशा झोपडपट्ट्यांमध्ये स्थायिक झाले ज्यांवर हळूहळू माफियांचे नियंत्रण प्रस्थापित झाले. मुंबईत ज्याला 'झोपडपट्टी' म्हणतात त्याला दिल्लीत 'अनधिकृत वसाहत' असे संबोधले जाते. ज्यांना कायदेशीर दर्जा देण्याचे आश्वासन प्रत्येक राजकीय पक्ष देत असतो.

मुंबई जीर्ण जुन्या गिरण्या आणि झोपडपट्ट्यांच्या जागी नवीन बांधकामे करून त्यांचा वापर करून घेतला. चांगली गोष्ट म्हणजे आता 'नवी मुंबई' हे एक नवे शहर विकसित झाले आहे. या भागाला 'ट्रान्स-हार्बर लिंक'द्वारे मुख्य भूमीशी जोडण्याचे काम सुरू आहे. दुसरीकडे, दिल्लीने अधिक सोयीस्कर पण समस्या निर्माण करणारा मार्ग निवडला. त्यांनी गुरुग्राम आणि नोएडासारखी मोठी उपनगरे वसविण्यास मुभा दिली. यामुळे या तीनही ठिकाणांच्या दरम्यान वाहनांची मोठी ये-जा सुरू झाली असून, वाहतुकीची एक गंभीर समस्या निर्माण झाली आहे. मात्र, दिल्लीच्या लोकसंख्येचा मोठा हिस्सा आजही अनधिकृत वस्त्यांमध्ये अत्यंत अमानवीय परिस्थितीत राहतो. संजय गांधी यांनी या वस्त्यांना 'जेजे कॉलनी' असे गोंडस नाव दिले होते. जेजे कॉलनी म्हणजेच झुग्गी-झोपडी.

बेंगळूरचा विस्तार अत्यंत विस्कळीतपणे झाला आहे. शहराचे मध्यवर्ती ठिकाण आणि आर्थिक केंद्र यांच्यातील दळणवळण व्यवस्था जगातील सर्वात वाईट स्थितीत आहे. येथील काही अत्यंत श्रीमंत वस्त्यांमध्ये पावसाळ्यात दुसऱ्या मजल्यापर्यंत पाणी भरते. उर्वरित वर्षभर तिथे पाण्याची तीव्र टंचाई असते. भारताच्या या 'सिलिकॉन व्हॅली'वर 'टँकर माफिया'चे वर्चस्व आहे. कोलकत्त्याबद्दल काय बोलावे? शहराच्या बाहेरील काही नवीन विकासकामांचा अपवाद वगळता तिथल्या बहुतांश भागाचे वर्णन 'झोपडपट्टी' या शब्द न वापरता करणे कठीण आहे. तिथल्या बहुसंख्य लोकसंख्येचे जीवनमान आजही तशाच प्रकारचे आहे. केवळ एका प्रमुख भारतीय शहराने या प्रवाहाच्या विरोधात वाटचाल केली आणि तेव्हा ते शहर महानगर बनलेलेही नव्हते. हैदराबादने आपले मूळ अस्तित्व आणि ऐतिहासिक वारशाला तंत्रज्ञान-उद्योजकतेची ताकद जोडली. १९९५ मध्ये सुरू झालेल्या पहिल्या कार्यकाळात चंद्राबाबू नायडू यांनी याची सुरुवात केली होती. बेंगळूरला टक्कर देण्यासाठी त्यांनी 'सायबराबाद'ची स्थापना केली. त्यानंतर सत्तेवर आलेले काँग्रेसचे वाय.एस. राजशेखर रेड्डी यांनी या तेलुगू उद्योजकतेच्या धोरणाला पुढे नेले. राजकीय स्थित्यंतराच्या काळात हे शहर केवळ तग धरून राहिले नाही तर ते भरभराटीलाही आले.

शहरांवर लक्ष केंद्रित करून आणि राज्याचे 'सीईओ' (मुख्य कार्यकारी अधिकारी) म्हणून वागून चूक केली आणि या प्रक्रियेत गरिबांकडे दुर्लक्ष केले, असा आक्षेप नायडू यांच्यावर अनेकांनी घेतला होता. २०१९ च्या पराभवानंतरही अमरावती प्रकल्पाबाबतचा त्यांचा आग्रह कायम आहे आणि ही एक चांगली गोष्ट आहे. मी आधीच सांगितले होते की, हा स्तंभ अमरावतीबद्दल नाही. मात्र, विशेषतः शहरीकरणाच्या क्षेत्रातील येथील नाविन्यपूर्ण प्रयोग उल्लेख करण्यासारखे आहेत. आपल्या देशात पायाभूत सुविधांच्या उभारणीसमोरील सर्वात मोठे आव्हान म्हणजे जमीन अधिग्रहणाचे. मात्र, अमरावतीमध्ये यासाठी विरोध का झाला नाही? यासाठीची नायडूंची पहिली नाविन्यपूर्ण कल्पना म्हणजे 'लँड-पूलिंग' (जमीन एकत्रीकरण) योजना. यामध्ये शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनी विकण्याऐवजी त्या एकत्रित प्रकल्पासाठी देण्याचे आवाहन करण्यात आले. त्या बदल्यात प्रत्येक एकरामागे विकसित निवासी आणि व्यावसायिक भूखंडांमधील हिस्सा देण्याचे आश्वासन देण्यात आले. राजधानी उभारली जाईपर्यंत व जमिनीचे रूपांतर आर्थिक मालमत्तेत होईपर्यंत शेतकऱ्यांनी काय करावे? त्यासाठी नायडू यांनी दरवर्षी प्रति एकर पन्नास हजार रुपयांपासून सुरू होणारी आणि दरवर्षी पाच टक्क्यांनी वाढणारी वार्षिक रक्कम (ॲन्युइटी) देण्याचे आश्वासन दिले. आज ही रक्कम ९५ हजार एवढी आहे. ही रक्कम कोणत्याही शेतकऱ्याला एका एकरातून मिळणाऱ्या उत्पन्नापेक्षा कितीतरी अधिक आहे. अशा प्रकारे अंदाजे ३३ हजार एकर जमीन एकत्रित करण्यात आली. सरकारने नियोजित शहराच्या आसपास स्वतःची आणखी २० हजार एकर जमीन यात जोडली. यामुळे एकूण क्षेत्रफळ सुमारे ५३ हजार एकर किंवा २१७.२३ चौरस किलोमीटर इतके झाले.

हे एक नियोजित शहर असून, यात शहराची विभागणी सुव्यवस्थितपणे एक चौरस किलोमीटरच्या ब्लॉकमध्ये (खंडांमध्ये) करण्यात आली आहे. विशेष म्हणजे, संपूर्ण शासन यंत्रणा, ज्यात विविध सरकारी कार्यालये, मंत्री, लोकप्रतिनिधी, उच्च न्यायालय, विधानसभा, विधान परिषद आणि सर्व श्रेणीतील कर्मचारी यांचा समावेश आहे, ती सात किलोमीटर लांबीच्या मध्यवर्ती पट्ट्यात (सेंट्रल मीडियन) केंद्रित असेल. यासाठी केवळ सात चौरस किलोमीटर जागा वापरली जाईल. उर्वरित भागाचा विकास खासगी क्षेत्रातून केला जाणार आहे. यामध्ये विद्यापीठे, संशोधन केंद्रे आणि 'आयबीएम क्वांटम हब' यांचा समावेश आहे. हे महत्त्वाचे यासाठी आहे कारण सरकारचा उपलब्ध असलेली सर्व मोकळी जमीन स्वतःच्या ताब्यात घेण्याकडे कल असतो. येथे सरकारकडे या सात चौरस किलोमीटरपेक्षा जास्त जमीन नाही. हा दुसरा नाविन्यपूर्ण बदल आहे.

तिसरी बाब म्हणजे एक प्रकारचा राजकीय विमा. समजा कोणीतरी तुमच्या आश्वासित सवलतींच्या भरवशावर गुंतवणूक केली आणि त्यानंतर सत्ता गेली तर काय? त्यासाठी नायडू यांनी या आठवड्यात एक कायदा संमत केला आहे. या कायद्यानुसार उद्योजकांकडून मिळणाऱ्या करांचा काही हिस्सा 'एस्क्रो' खात्यांमध्ये जमा केला जाईल आणि ठरलेल्या तारखांना त्यातून अनिवार्यपणे भरणा केला जाईल. अशाच राजकीय आणि प्रशासकीय नाविन्यपूर्ण उपाययोजनांच्या आधारावर ते एक ट्रिलियन रुपयांचे शहर उभारण्याचे काम करत आहेत. इतर मुख्यमंत्र्यांसाठी हे एक उत्तम उदाहरण आहे. काही जोखीम पत्करा आणि त्यांच्या शब्दांत सांगायचे तर, संपत्ती निर्माण करा, जेणेकरून सरकार अधिक महसूल मिळवू शकेल आणि त्याचे वाटपही करू शकेल.

अनुवाद : किशोर जामकर

## साहित्य फराळ

### ललित



यंदा ६३ व्या वर्षात पदार्पण करणारा 'ललित'चा दिवाळी अंक वाचकांसाठी देशी-विदेशी साहित्याची अनोखी मेजवानी घेऊन आला आहे. या अंकातून साहित्यिकांना मुक्त व्यासपीठ मिळाले असून, वाचकांना साहित्याची नवी गोडी चाखायला मिळणार आहे.

या अंकातील वसंत आबाजी डहाके यांचा 'पुस्तकांविषयी' हा लेख विशेष वाचनीय आहे. घरातील पुस्तकांचा गोतावळा, पुस्तकांमुळे जीवनात होणारे सकारात्मक बदल आणि पुस्तकांशिवाय घर कसे सुनेसुने वाटते, याचे त्यांनी अत्यंत बारकाईने विवेचन केले आहे. हा लेख वाचकांना पुस्तकांच्या दुनियेत आपसूकच घेऊन जातो.

यशोधरा मीना वैशंपायन ('पहिला भारतीय पुरातत्त्व शास्त्रज्ञ'), भानू काळे ('विलास पाटील'), अनंत देशमुख, नीलिमा गुंडी ('कविता झालेले जगण्याचे पत्र'), सुहास जोशी ('कहाणी एका विलक्षण मायलेकीची'), प्रकाश खांडगे ('भारूड') आणि सुमती जोशी ('अनुभवाच्या अरण्यातून जाताना') यासह अनेक दिग्गज लेखकांच्या दर्जेदार लेखांनी हा अंक सजला आहे.

संपादक : अशोक कोठावळे, पृष्ठे : १९२, किंमत : ३०० रु.

### आगरी दर्पण



३१ वर्षांची परंपरा आणि ३२ पुरस्कारांचा मान मिळवणारा 'आगरी दर्पण'चा यंदाचा दिवाळी अंक वाचकांसाठी वैचारिक मेजवानी ठरत आहे. यंदाही अंकात वाङ्मयीन आणि वैचारिक समृद्धी जपण्यात आली आहे. 'आक्रोश तरुणांचा' या मध्यवर्ती विषयातून नव्या पिढीच्या अपेक्षा, अस्वस्थता आणि सामाजिक वास्तव मांडण्याचा प्रयत्न केला गेला आहे. विशेष म्हणजे, १९४० च्या मिठाच्या सत्याग्रहातील आगरी समाजाच्या योगदानाला उजाळा देत समाजाच्या संघर्षमय इतिहासाची आठवण करून देण्यात आली आहे. भाग्य वरखेडे यांचे तरुणाईच्या राज्यकर्त्यांना आव्हानात्मक विश्लेषण, डॉ. रवींद्र शिंगणे यांचा भूतानवरील लेख आणि भौगोलिक [illegible] महिलांच्या सक्षमीकरणाचा वेध अंकात आहे. 'मोदींची तपपूर्ती, देशाची इच्छापूर्ती की समस्यांची गर्दी' या परिसंवादात कर्नल अनिल आठल्ये, अजित अभ्यंकर आणि भालचंद्र कानगो यांनी आपली मते प्रांजळपणे मांडली आहेत. याशिवाय, 'जेन झी'ची बदलती जीवनशैली, सामाजिक-राजकीय पडझड, आरक्षण आणि अंधश्रद्धा निर्मूलन यांसारख्या अनेक विषयांवर मान्यवरांनी अभ्यासपूर्ण विचार मांडले आहेत.

संपादक : दीपक रा. म्हात्रे, पाने : १८८, किंमत : ३०० रु.

## 'वंदे भारत'मध्ये पुरणपोळी?

पान १ वरून

भारतीय पदार्थांना प्राधान्य आहे. बंगळूरहून गाडी सुटत असल्याने नाश्त्यामध्ये इडली, मेदूवडा, उपमा आणि चटणी, असे पदार्थ दिले जातात. महाराष्ट्रातील पदार्थांमध्ये सध्या केवळ कांदापोह्यांचा समावेश आहे. त्यामुळे मेनूमध्ये महाराष्ट्रातील आणखी पारंपरिक खाद्यपदार्थांचा समावेश करण्याचा विचार सुरू आहे. महाराष्ट्राच्या खाद्यसंस्कृतीत पुरणपोळीला विशेष स्थान आहे. सण-उत्सवांमध्ये आवर्जून बनविल्या जाणाऱ्या या पारंपरिक पदार्थाला राज्यभरात पसंती मिळते. त्यामुळे लांब पल्ल्याच्या रेल्वे प्रवासातही पुरणपोळी उपलब्ध करून देण्याचा आयआरसीटीसीचा विचार आहे. या पदार्थाचा समावेश झाल्यास प्रवाशांना प्रवासादरम्यान महाराष्ट्राच्या चवीचा आस्वाद घेता येईल.

## मानवाचा 'दूत'

पान १ वरून

१२ दिवसांचा काळ लोटल्यानंतरही अविरत प्रवास करत आहे.

**गतीज ताऱ्याच्या दिशेने**

कोणताही अडथळा आला नाही, तर 'व्हॉएजर १' यान पृथ्वीपासून उगम मानल्या जाणाऱ्या ऊर्टच्या मेघातून प्रवास करेल. उत्तर दिशेला असलेल्या करभ तारकासमूहातील 'ग्लीज ४४५' या ताऱ्यापासून सुमारे १.६ प्रकाशवर्षे अंतरावरून 'व्हॉएजर १'चा प्रवास सुमारे ४०,००० वर्षांनी होईल. 'ग्लीज ४४५' तारा पृथ्वीपासून १७ प्रकाशवर्षे दूर आहे.

**रोजचा संवाद**

गूढ अंधाराशी हे यान आपला जन्मदात्यांना विसरलेले नाही. 'व्हॉएजर' यानावरील रोज अवकाशातील कधीही न पाहिलेल्या परिसराची माहिती पृथ्वीवर पाठवली जाते. कॅलिफोर्नियातील पॅसाडेना येथील 'नासा'च्या 'जेट प्रोपल्शन लॅबोरेटरी'मधील वैज्ञानिक या यानाशी नियमित संपर्क साधून आठवड्यातून एकदा आवश्यक त्या सूचना पाठवत असतात.

## भयभीत बिल्किस बानोने कुटुंबासह गुजरात सोडले!

पान १ वरून

सुनावली होती. मात्र, २०२२मध्ये या सर्वांची तुरुंगातून सुटका करण्यात आली होती. सर्वोच्च न्यायालयाने २०२४मध्ये हा निर्णय रद्द करत सर्वांची पुन्हा तुरुंगात रवानगी केली होती. आता सर्वोच्च न्यायालयाने दोन आरोपींची शिक्षा स्थगित केली आहे.

"बानो आणि तिचे कुटुंबीय दहशतीमुळे राहण्याचे ठिकाण सारखे बदलत होते, मात्र ते गुजरातमध्येच होते. सर्वोच्च न्यायालयाचा निकाल आल्यानंतर दोन ते तीन नोव्हेंबरदरम्यान ते गुजरातबाहेर निघून गेले," असे तिचे काका रझाक मन्सुरी यांनी सांगितले. यानिमित्त बानोच्या वकिलांनाही काहीही माहिती नव्हती. या आरोपींना अधूनमधून जामीन मिळत होता आणि ते गावात येत होते. अशा पद्धतीने ते तुरुंगाबाहेर येत राहिले, तर ते काहीही करू शकत होते, त्यामुळे ती घाबरली होती, असेही मन्सुरी यांनी नमूद केले.

दरम्यान, सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशामुळे आपल्याला मोठा धक्का बसला असून, न्यायावर विश्वास ठेवणेही कठीण जात आहे. माझी बाजू ऐकून न घेताच हा आदेश देण्यात आल्याचे न्यायालयाच्या आदेशानंतर बानोने माध्यमांना दिलेल्या निवेदनात म्हटले होते. सर्वोच्च न्यायालयाने पुन्हा एकदा, दुसऱ्यांदा, मला बोलावून न घेता आणि माझी बाजू ऐकून न घेताच आदेश दिला आहे, यावर अजूनही माझा विश्वास बसत नाही. प्रसारमाध्यमांतील वृत्तांमधून मला या आदेशाची माहिती मिळाली, असेही तिने नमूद केले होते.

## राज्यात दुष्काळाची व्याप्ती वाढली

पान १ वरून

दुष्काळी परिस्थितीचे वस्तुनिष्ठ मूल्यमापन करून आवश्यक उपाययोजनांना गती देण्यासाठी पालक सचिवांनी अधिवेशनापूर्वी राज्यातील सर्व जिल्ह्यांना भेट देऊन दुष्काळाच्या सर्व निकषांनुसार परिस्थितीचा सविस्तर आढावा घेऊन त्याबाबतचा अहवाल मुख्य सचिवांकडे सादर करावा, असे निर्देश बावनकुळे यांनी बैठकीत दिले.

दुष्काळी परिस्थिती लक्षात घेऊन मृद आणि जलसंधारण विभागाचा यापूर्वी मंजूर करण्यात आलेला पाच हजार कोटी रुपयांचा नियोजन आराखडा रद्द करून नव्याने आराखडा तयार करण्याची सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे. या नवीन आराखड्यात विदर्भ आणि मराठवाड्यासह भीषण दुष्काळी परिस्थिती असलेल्या तालुक्यांना प्राधान्य देण्यात यावे. यासाठी पुढील एक-दोन महिन्यांत कार्यपद्धती (एसओपी) निश्चित करावी, असे निर्देश बावनकुळे यांनी या वेळी दिले. दुष्काळी परिस्थितीवरील उपाययोजनांचा समन्वय आणि प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांची समिती स्थापन करण्याबाबतही बैठकीत चर्चा झाली.

या बैठकीला कृषिमंत्री दत्तात्रय भरणे, जलसंधारण मंत्री संजय राठोड, वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, मत्स्यव्यवसाय मंत्री नितेश राणे, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, मदत आणि पुनर्वसन विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव विनिता वेद सिंघल आदी उपस्थित होते.

**बृहन्मुंबई महानगरपालिका**
लोकमान्य टिळक महानगरपालिका सर्वसाधारण रुग्णालय व
लोकमान्य टिळक महानगरपालिका वैद्यकीय महाविद्यालय शीव, मुंबई -२२.

क्र.लोटिरू / ET-04/ निविदा दि. 17.11.2026

**ई-निविदा सूचना**

ही ई-निविदा सूचना आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेचे (बृमुं मनपा) आयुक्त खालील दर्शविल्यानुसार **दोन पॅकेट प्रणालीतून ई-निविदा मागवित आहेत.**

**कामाचे विवरण** – लो.टि.म.स. रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालय येथील Radiology विभागाकरिता Cassettes and Plates set (CR 12X) Qty.15 Set हे वस्तू खरेदी करण्याकरिता GeM portal मार्फत ई-निविदा मागविण्याबाबत.

**बोली क्र. GEM/2026/B/8266595**

| अ. क्र. | ई-निविदा शुल्क (रु.) | इसारा रक्कम | ऑनलाईन बोली द्वारा लोडिंगची सुरुवातीची तारीख व वेळ | ऑनलाईन बोली सादरीकरणाची अंतिम तारीख व वेळ |
|---|---|---|---|---|
| 1 | रु. 3993 अधिक जीएसटी 18% = 4711.74 | रुपये 25,830/- | दि. 18.11.2026 रोजी दु. 4.00 वा. | दि. 28.11.2026 रोजी दु. 4.30 वा. |

**टीप - इसारा अनामत ठेव व निविदा शुल्क डिमांड ड्राफ्ट (DD) याची पीडीएफ अंतिम तारीख व वेळेपर्यंत अपलोड करण्यात यावी; तसेच सदर मूळ डिमांड ड्राफ्ट (DD) रुग्णालयातील निविदा विभागात तांत्रिक पॅकेट उघडण्यापूर्वी सादर करणे आवश्यक आहे.**

इच्छुक निविदाकारांनी निविदेच्या अधिक तपशिलासाठी http://www.gem.gov.in या संकेतस्थळावर भेट देण्याची विनंती करण्यात येत आहे. निविदा कागदपत्रे टपालद्वारे पाठवली असल्यास स्वीकारली जाणार नाहीत.

डास कमी करा तापाळी, कारा तपासणी तरावी

PRO/1928 /ADV/2026-27

सही/-
अधिष्ठाता (लोटिरू)

eClerx
**ईक्लर्क्स सर्व्हिसेस लिमिटेड**
CIN: L72200MH2000PLC125319
नोंदणीकृत कार्यालय : सोनावाला बिल्डिंग, १ला मजला, २९ बँक स्ट्रीट, फोर्ट, मुंबई-४०००२३, भारत, फोन:+९१ (२२) ६६१४८३०१, फॅक्स क्र.+९१(२२) ६६१४८६५५
ईमेल: investor@eclerx.com वेबसाईट: www.eclerx.com

**टपाल मतदान सूचना**

[illegible] www.eclerx.com [illegible] www.bseindia.com [illegible] www.nseindia.com [illegible] http://evoting.kfintech.com [illegible] https://evoting.kfintech.com/ [illegible] evoting@kfintech.com [illegible] www.eclerx.com [illegible]

ईक्लर्क्स सर्व्हिसेस लिमिटेड करिता
सही/-
प्रतिक भट्टाचार्य
व्हीपी–कायदेशीर आणि कंपनी सचिव
एफ ८५३८

दिनांक : नोव्हेंबर १७, २०२६
ठिकाण : मुंबई

**जाहीर नोटीस**

[illegible]

| दिशा | ३० मी. प्रा.यो. रस्त्यालगतील क्षेत्र |
|---|---|
| उत्तर | लागू स.नं. १३ ची उर्वरित मिळकत |
| दक्षिण | लागू स.नं. ४७७ ची मिळकत |
| पूर्व | लागू स.नं. ११/१२/१३ ची उर्वरित मिळकत |
| पश्चिम | लागू उपरोक्त हीच |

[illegible]

सही/- [illegible] (संचालक)
विकास परवानगी विभाग
पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे

vedanta transforming for good

**वेदांता लिमिटेड**
सीआयएन : L13209MH1965PLC291394
नोंदणीकृत कार्यालय : [illegible] मुंबई - ४०००९३, महाराष्ट्र, भारत
ई-मेल आयडी : comp.sect@vedanta.co.in वेबसाईट : www.vedantalimited.com

**सूचना - कागदोपत्री स्वरूपातील शेअर्सचे हस्तांतरण व डीमॅटकरिता स्पेशल विन्डो**

भारतीय प्रतिभूती व विनिमय मंडळ (सेबी) यांचे परिपत्रक क्र. एसईबीआय/एचओ/[illegible] २०२६, दि. ३० जानेवारी, २०२६ अन्वये आम्ही असे सूचित करू इच्छित आहोत की, कागदोपत्री स्वरूपातील शेअर्सचे हस्तांतरण व डीमटेरियलायझेशनकरिता दि. ०४ फेब्रुवारी, २०२७ पर्यंत एक स्पेशल विन्डो खुली असेल.

दि. ०१ एप्रिल, २०१९ पूर्वी ज्यांनी कंपनीचे शेअर्स कागदोपत्री स्वरूपात खरेदी केलेले होते आणि यापूर्वी अशा हस्तांतरण विनंत्या सादर करण्यात आल्या होत्या आणि दस्तावेजांतील कमतरता/प्रक्रिया वा अन्य कारणास्तव रद्द झाल्या होत्या/परत आल्या होत्या/दुर्लक्षित राहिल्या होत्या अशा वेदांता लिमिटेड (कंपनी) च्या कागदोपत्री स्वरूपातील भागधारकांकरिता सदर सूचना आहे.

सदर विन्डोच्या उपयुक्ततेसंदर्भातील पुढील स्पष्टिकरणाकरिता खालील तक्ता पहावा :

| हस्तांतरण करार अंमलबजावणी दिनांक | दि. ०१ एप्रिल, २०१९ पूर्वी हस्तांतरणाकरिता दाखल करण्यात आली होती का | मूळ सीक्युरिटी प्रमाणपत्र उपलब्ध आहे का | विद्यमान विन्डोमध्ये दाखल करण्यास पात्र आहात का? |
|---|---|---|---|
| दि. ०१ एप्रिल, २०१९ पूर्वी | नाही (नवीन सादरीकरण आहे) | होय | ✓ |
| दि. ०१ एप्रिल, २०१९ पूर्वी | होय (यापूर्वी रद्द झाली होती/परत आली होती) | होय | ✓ |
| दि. ०१ एप्रिल, २०१९ पूर्वी | होय | नाही | ✓ |
| दि. ०१ एप्रिल, २०१९ पूर्वी | नाही | नाही | ✓ |

सेबी परिपत्रकांच्या अनुपालनांतर्गत याची नोंद घ्यावी की, गुंतवणूकदार/हस्तांतरितींना वेळोवेळी सूचित केल्यानुसार व पुनरावलोकनाच्या अधीन, (१) मूळ शेअर प्रमाणपत्र, (२) दि. ०१ एप्रिल, २०१९ पूर्वी केलेला हस्तांतरण करार, (३) हस्तांतरितींद्वारे खरेदीचा पुरावा, जो उपलब्ध असेल, (४) केवायसी दस्तावेज अर्थात आयएसआर फॉर्म, (५) डिपॉझिटरी पार्टिसिपंटद्वारे साक्षांकित केलेले हस्तांतरितांचे किमान २ महिने जुने असलेले डीमॅट खात्याची क्लायन्ट मास्टर लिस्ट व (६) वरील सेबी परिपत्रकात नमूद केल्यानुसार प्राप्य ए नुसार क्षतिपूर्तीपत्र तथा अनुबंध हे दस्तावेज सादर करणे अनिवार्य आहे. सदर विन्डोअंतर्गत हस्तांतरित केलेले कोणतेही शेअर्स केवळ डीमॅट स्वरूपात वितरीत करण्यात येतील.

ज्या भागधारकांना स्पेशल विन्डो प्राप्त करावयाची असेल त्यांनी कंपनीचे रजिस्ट्रार व ट्रान्सफर एजंट - मे. केफिन टेक्नॉलॉजीस लिमिटेड, युनिट : वेदांता लिमिटेड, सेलेनियम बिल्डिंग, टॉवर बी, प्लॉट ३१-३२, गाचीबोवली, फायनान्शियल डिस्ट्रिक्ट, नानकरामगुडा, सेरिलिंगमपल्ली, हैदराबाद - ५०० ०३२.

वेदांता लिमिटेडकरिता व त्यांच्या वतीने
सही/-
प्रेरणा हलवासीया
कंपनी सचिव व अनुपालन अधिकारी
एसीएस नं. : २०८५६

ठिकाण : नवी दिल्ली
दिनांक : १८.११.२०२६